सन २०२६-२७ मधील प्राप्त तरतूदीचे वितरण करणेबाबत.
नाशिक व नागपूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांना भागभांडवली अंशदान (४४२५ ०७६८)

महाराष्ट्र शासन
सहकार विभाग
शासन निर्णय क्र. जिमस.०४२६/प्र.क्र.७१/२-स
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक : १५ जुलै, २०२६

संदर्भ :- शासन निर्णय, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग क्र. जिमस. ०१२४/प्र.क्र.१६/२-स, दि. ३०.०३.२०२६

प्रस्तावना:-

भारतीय रिझर्व्ह बँकेने जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांसाठी किमान भांडवल पर्याप्तता ९ टक्के विहित केलेली आहे. त्यानुसार सर्व बँकांनी भांडवल पर्याप्तता राखणे बंधनकारक आहे. सदर प्रमाण विहित प्रमाणापेक्षा उणे झाल्यास अशा बँकेवर भारतीय रिझर्व्ह बँकेकडून कायदेशीर कारवाई होऊ शकते.

दिनांक ३१.०३.२०२४ च्या आर्थिक स्थितीनुसार नाशिक व नागपूर या जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका भारतीय रिझर्व्ह बँकेच्या निकषानुसार भांडवल पर्याप्तता तसेच बँकिंग नियमन अधिनियम, १९४९ च्या कलम ११ (१) ची पूर्तता करीत नाहीत. या पार्श्वभूमीवर भारतीय रिझर्व्ह बँकेने दिनांक ३०.०४.२०२४ रोजी या बँकांचे पुनर्भांडवलीकरण व पुनरुज्जीवन करण्याबाबत शासनास विनंती केली आहे. तद्नंतर भारतीय रिझर्व्ह बँकने दिनांक १३.०८.२०२४ रोजीच्या पत्रान्वये आर्थिकदृष्ट्या कमकुवत असलेल्या जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांनी कायदेशीर तरतुदींची पूर्तता न केल्यास अशा बँकांवर कारवाई करण्यात येईल असे शासनास कळविले आहे.

नाशिक व नागपूर या जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांना ९ टक्के भांडवल पर्याप्तता (CRAR) साध्य करण्यासाठी भागभांडवल स्वरुपात शासकीय अर्थसहाय्य मंजूर करण्याबाबतचा प्रस्ताव दि. ११.११.२०२५ च्या मंत्रिमंडळ बैठकीत सादर करण्यात आला होता. सदर प्रस्तावास मंत्रिमंडळाची मान्यता प्राप्त झाली आहे. त्यास अनुसरुन संदर्भाधीन शासन निर्णय दि. ३०.०३.२०२६ अन्वये या बँकांचे सक्षमीकरण व पुनरुज्जीवन करण्यासाठी भागभांडवल स्वरुपात शासकीय अर्थसहाय्य मंजूर करण्यात आले आहे. त्यानुषंगाने नाशिक व नागपूर या जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांना भागभांडवली अंशदान या योजनेअंतर्गत निधी वितरीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय:-

भारतीय रिझर्व बँकेच्या निकषानुसार ९ टक्के भांडवल पर्याप्तता (CRAR) साध्य करण्यासाठी नाशिक व नागपूर या जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांना मागणी क्रमांक व्ही-३, ४४२५-सहकारावरील भांडवली खर्च, (००) (१०७) पत सहकारी संस्थांमधील गुंतवणूक, (०४)(०२) जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांना

भागभांडवल (राज्यस्तर) (कार्यक्रम) (४४२५०७६८), ३२-अंशदान या लेखाशिर्षाअंतर्गत मंजूर करण्यात आलेल्या रु. ५०.०० कोटी निधीपैकी अनुक्रमे रु. ८.०० कोटी व रु. २.०० कोटी असे एकूण रुपये १०.०० कोटी शासकीय अर्थसहाय्य वितरीत करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

२. नाशिक व नागपूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेस सदर अर्थसहाय्य शासन निर्णय दि. ३०.०३.२०२६ मधील अटी-शर्तीस अधीन राहुन मंजूर करण्यात येत आहे.

३. सदर तरतूद खर्च करण्यासाठी (V०००४) सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे अधिनस्त सहाय्यक निबंधक (अंदाज व नियोजन), सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना नियंत्रण अधिकारी म्हणून प्राधिकृत करण्यात येत आहे. तसेच लेखाधिकारी, सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषीत करण्यात येत आहे. सदर निधी आहरण करुन वेळेत खर्च होईल याची दक्षता सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी घ्यावी. याबाबतचा अहवाल व खर्चाची माहिती वेळोवेळी शासनास सादर करावी. तसेच उपयोगिता प्रमाणपत्र सादर करण्याची जबाबदारी सहकार आयुक्त कार्यालयाची राहील.

४. सदर अर्थसहाय्याकरीता येणारा खर्च मागणी क्रमांक व्ही-३, ४४२५-सहकारावरील भांडवली खर्च, (००) (१०७) पत सहकारी संस्थांमधील गुंतवणूक, (०४)(०२) जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांना भागभांडवल (राज्य योजना) (दत्तमत) (४४२५०७६८), ३२-अंशदान या लेखाशिर्षाखाली खर्ची घालण्यात यावा.

५. सदर शासन निर्णय, वित्त विभाग अनौपचारीक संदर्भ क्रमांक ३२७/२०२६/व्यय-२, दिनांक १५.०५.२०२६ अन्वये दिलेल्या सहमतीनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

६. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक क्रमांक २०२६०७१५१६४१४८०७४७ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकीत करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

SANTOSH ARUN PATIL

Digitally signed by SANTOSH ARUN PATIL
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=CMTD, 2.5.4.20=CA78467BCC4594E1E11741A7962A7A83FEAFB176442575037160FC343C4AE5AB, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=E52439642AB57C332B2A3E3E46F0D907BA6167409EF6D52C943BF775ECF042FD, cn=SANTOSH ARUN PATIL
Date: 2026.07.15 16:43:03 +05'30'

(संतोष पाटील)
अपर निबंधक तथा सहसचिव,
महाराष्ट्र शासन

प्रत,

१) मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
२) मा. उपमुख्यमंत्री (नगर विकास) यांचे प्रधान सचिव
३) मा. उपमुख्यमंत्री (रा.ऊ.शु.) यांचे सचिव
४) मा. मंत्री / मा. राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव (सर्व)
५) मा. विधानसभा / मा. विधानपरिषद सदस्य (सर्व)
६) मा. अपर मुख्य सचिव (वित्त), मंत्रालय, मुंबई
७) मा. सचिव (नियोजन), मंत्रालय, मुंबई.
८) प्रधान महालेखाकार (लेखापरीक्षा - १/२), महाराष्ट्र राज्य, मुंबई/नागपूर
९) प्रधान महालेखाकार Voucher Level Computer Section (VLC), मुंबई
१०) रिजनल डायरेक्टर, भारतीय रिझर्व बँक, प्रादेशिक कार्यालय, मुंबई/नागपूर

११) सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, पुणे
१२) मुख्य महाप्रबंधक, नाबार्ड, प्रादेशिक कार्यालय, पुणे
१३) अधिदान व लेखा अधिकारी, पुणे
१४) निवासी व लेखापरिक्षा अधिकारी, पुणे
१५) जिल्हा कोषागार अधिकारी,पुणे
१६) विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था (नाशिक/ नागपूर)
१७) जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था (नाशिक/ नागपूर)
१८) वित्त विभाग (अर्थसंकल्प-१३/ व्यय-२), मंत्रालय, मुंबई
१९) अवर सचिव (कार्यासन १७-स), सहकार, पणन वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई
२०) निवडनस्ती (कार्यासन २-स)